इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

**मुंबई उच्च न्यायालय**
**नागपूर खंडपीठ, नागपूर**

**पहिले अपील क्रमांक २०८/२०२२**
**सोबत**
**दिवाणी अर्ज क्रमांक १२७०/२०२२**

शाखा व्यवस्थापक,
एसबीआय जनरल इन्शुरन्स
कंपनी लि., तिसरा मजला,
एसबीआय बँकेच्या वर, थापर,
एन्क्लेव्ह, महाराजबाग रोड,
रामदासपेठ, नागपूर ...अपीलकर्ता (मूळ उत्तरवादी क्रमांक २)

विरुद्ध

1. श्रीमती खैरुन जहीर खान
वय : ४९ वर्षे, धंदा- गृहिणी

2. जावेद जहीर खान,
वय : २४ वर्षे, धंदा- कामगार,

3. जाफर जहीर खान,
वय : १८ वर्षे, धंदा- कामगार

सर्व राहणार: सी/ओ.:
जाफर जुम्मन शाह,
२६८, गृहलक्ष्मी हाऊसिंग
सोसायटी, दुर्गानगर,

नागपूर ४४००३५ ... (मूळ याचिकाकर्ते क्र.१ ते ३)

4. मो. नईम मो. समीम खान
वय: सज्ञान, धंदा: मालक ... (मूळ उत्तरवादी क्र.१)
राहणार: पोस्ट मौदा मस्जिद जवळ
ता. मौदा, जि.: नागपूर ... उत्तरवादी

....

अपीलकर्त्याचे वकील, श्रीमती मृणाल नाईक

उत्तरवादी क्रमांक १ ते ३ यांचे वकील श्री पी. एस. मिराचे

....

**न्यायमंच : न्यायमूर्ती संजय देशमुख.**
**राखीव दिनांक : २०/१२/२०२४.**
**घोषित दिनांक : ०३/०१/२०२५**

**न्याय*निर्णय* :**

1. मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, नागपूर च्या विद्वान सदस्यानी दिनांक २८/०९/२०२१ रोजी क्लेम पिटीशन क्रमांक १२४७/२०२१ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णय आणि अवॉर्ड विरुद्ध विमा कंपनीने हे अपील दाखल केले आहे. दावा याचिका मंजूर करण्यात आली.

2. दावा :

(i) याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे की, याचिकाकर्ता क्रमांक १ ही मयत सलमान जाहीर खान याची आई असून याचिकाकर्ते क्रमांक २ व ३ हे त्याचे भाऊ आहेत, ज्यांचा १४/०८/२०१३ रोजी वाहन अपघातात मृत्यू झाला होता.

(ii) याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, १४/०८/२०१३ रोजी सलमान खान भंडारा रोडवर एमएच-३१-डीटी-०२७९ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून जात होता आणि जेव्हा तो नागपूरच्या लकडगंज पोलीस ठाण्याजवळील मेहता पेट्रोल पंपावर पोहोचला तेव्हा समोरून आलेल्या एमएच-४०-वाय ८६८६ क्रमांकाच्या ट्रकने समोरून भरधाव वेगाने येऊन सलमान खानच्या मोटारसायकलला धडक दिली. ट्रक चालक बेदरकारपणे व निष्काळजीपणे गाडी चालवत होता. त्यामुळे हा अपघात घडला. परिणामी, या अपघातात सलमानचा जागीच मृत्यू झाला. मयताचा पंचनामा करण्यात आला. शवविच्छेदन करण्यात आले.

(iii) ट्रक चालका विरोधात भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम २७९, ३०४ (अ) आणि ३३८ अन्वये (थोडक्यात आयपीसी) गुन्हा क्रमांक २५६/२०१३ दाखल करण्यात आला.

(iv) याचिकाकर्त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, मयत सलमान हा चालक होता. तो आपल्या कुटुंबाचा एकमेव कमावणारा होता. तो दरमहा रु.९,०००/- कमवत होता. याचिकाकर्ते त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून होते. त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांचे मोठे

आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे, त्यांनी अपघात झालेल्या ट्रकचे मालक आणि विमा कंपनीकडून म्हणजेच उत्तरवादी क्रमांक १ आणि २ कडून रु.१३,९६,०००/- नुकसान भरपाईचा दावा केला आहे.

3. बचाव:

(i) विमा कंपनी - उत्तरवादी क्रमांक २ ने दाव्याला विरोध केला आणि दावा याचिकेत उपस्थित केलेले युक्तिवाद, विशेषत: मृत सलमानचे नाव, वय, व्यवसाय आणि उत्पन्न नाकारले. (ii) विमा कंपनीने असा युक्तिवाद केला की याचिकाकर्त्यांनी सलमानच्या नियोक्ताचे नाव आणि त्याच्या नोकरीचे स्वरूप उघड करणारी कोणतीही कागदपत्रे सादर न करता खोटा दावा दाखल केला आहे. ज्या ट्रकने अपघात झाला तो ट्रक हा उत्तरवादी क्रमांक १ च्या मालकीचा आहे हे विधान त्यांनी नाकारले. या याचिकेत संबंधित मोटारसायकलच्या मालकाला पक्षकार करण्यात आलेले नाही. तो आवश्यक पक्ष आहे. या शिवाय असेही नमूद केले की सलमानकडे गाडी चालवण्यासाठीचा वैध ड्रायव्हिंग परवाना नव्हता. अखेर विमा कंपनीने अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

4. विद्वान न्यायाधिकरणाने खालील मुद्दे तयार केले:

(*1*) एमएच *-४० वाय-* ८६८६ क्रमांकाच्या ट्रकचालकाने तो ट्रक बेदरकारपणे आणि निष्काळजी पणाने चालवला का?

(2) *अशा* प्रकारच्या चालवण्यामुळे, *सदर ट्रकने* मयताच्या *हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकलला धडक दिली आणि* त्याच्या *मृत्यूचे कारण ठरले का?*

(3) *मृत व्यक्तीचे वय २६ वर्षे होते का आणि तो* दरमहा रु.९,०००/- *कमावत होता का?*

(4) *आवश्यक पक्षकाराला पक्ष न केल्यामुळे याचिका* बेकायदेशीर *आहे का?*

(5) विमा धोरणांच्या *अटी व शर्तींचे उल्लंघन झाले आहे का?*

(6) *किती नुकसान भरपाईस याचिकाकर्ते पात्र आहेत?*

(7) काय *आदेश दिला पाहिजे?*

5. विद्वान न्यायाधिकरणाने मुद्दे तयार केल्यानंतर असे म्हटले की, उत्तरवादी क्रमांक १ व २ संयुक्तपणे व वैयक्तिकपणे दावेदारांना रु.७,४९,०००/- नुकसान भरपाई देण्यास उत्तरदायी आहेत.

6. अपीलकर्त्याच्या - विमा कंपनीच्या अभ्यासू वकिलाने युक्तिवादादरम्यान असा युक्तिवाद केला की, हा खोटा दावा आहे जो उत्तरवादी क्रमांक १ ते ३ यांच्याकडून केला गेला आहे. त्या पुढे म्हणाल्या की, विद्वान न्यायाधिकरणाने दावेदार खैरुन (एडब्ल्यू-१) यांचा उलटतपास विचारात घेतला नाही, ज्यात तिने टाळाटाळ करणारी उत्तरे दिली

होती. निशाणी-३३ येथील शवविच्छेदन अहवालात नमूद केल्याप्रमाणे मृताचे नाव सलमान खान जहीर खान @ जसवंत यादव राहणार भारत नगर कलामना, नागपूर असे आहे जे संदिग्ध आहे. दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या मयताच्या पंचनाम्यातही अशीच दोन नावे समोर आली आहेत. एका व्यक्तीची दोन नावे का आहेत, याबाबत उत्तरवादी क्रमांक १ ते ३ कडून कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. याचिकाकर्ते मृतव्यक्तीशी त्यांचा असलेला संबंध दर्शविणारी संबंधित कागदपत्रे सादर करण्यात अपयशी ठरले आणि ते त्याच्यावर अवलंबून नाहीत. त्यांनी पुढे नमूद केले की हे एक खोटे प्रकरण आहे. शेवटी अपील मंजूर करून आक्षेपार्ह निकाल रद्द करण्याची विनंती केली.

7. उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या अभ्यासू वकिलाने युक्तिवादादरम्यान सांगितले की, नुकसान भरपाईचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी पुरेसे पुरावे पटलावर सादर करण्यात आले आहेत. एफआयआर निशाणी-३० मध्ये उत्तरवादी क्रमांक १ च्या मुलाचे नाव नमूद करण्यात आले आहे. न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये विद्वान न्यायाधीकरणाने हे स्पष्ट केले आहे की, विमा कंपनीने फसवणुकीचा दावा सिद्ध केलेला नाही. उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या अभ्यासू वकिलांनी असेही निदर्शनास आणून दिले की, न्यायधीकरणाने नोंदवलेली कारणे आणि निष्कर्ष हे कायदेशीर आणि योग्य आहेत आणि म्हणूनच, विवादित न्यायनिर्णयात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

8. दोन्ही पक्षांची सविस्तर बाजू ऐकून घेतल्यानंतर या न्यायालयाने वकिलांच्या विनंतीवरून दिनांक १२/१२/२०२४ च्या आदेशाद्वारे उत्तरवादींना मृत सलमान खान बद्दलची कागदपत्रे विशेषत: त्याचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, त्याचे आधार कार्ड, त्याचे निवडणूक ओळखपत्र, त्याचे रेशन कार्ड, त्याचे बँक बुक, त्याचे बँक खात्याचे स्टेटमेंट किंवा बँक खात्याचा उतारा आणि त्याचे मतदार यादीत नाव असल्याचे दर्शविणारी कागदपत्रे सादर करण्याची संधी दिली.

9. हे अपील १८/१२/२०२४ रोजी अंतिम सुनावणी साठी व वरील कागदपत्रे असल्यास सादर करण्यासाठी निश्चित करण्यात आले होते. दिनांक १८/१२/२०२४ रोजी उत्तरवादी क्रमांक १ ते ३ चे विद्वान वकील कागदपत्रे सादर करू शकले नाहीत. त्यानंतर दोन दिवसांची मुदत देण्यात आली आणि वरील कागदपत्रे असल्यास ती सादर करण्यासाठी अपिलाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र, अशी कोणतीही कागदपत्रे पटलावर सादर करण्यात आली नाहीत. त्यामुळे, या प्रकरणाची अंतिम सुनावणी २०/१२/२०२४ रोजी निश्चित करण्यात आली. त्या दिवशी देखील अशी कोणतीही कागदपत्रे पटलावर सादर केली गेली नाहीत. त्यामुळे या न्यायालयाने या अपिलाची सुनावणी पूर्ण केली आणि ते न्यायनिर्णयासाठी राखून ठेवले.

10. न्यायालयाने आक्षेपार्ह निकाल, या अपिलाच्या आक्षेपाची कारणे आणि कनिष्ठ न्यायालयातील सुनावणीतून समोर आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

11. या अपिलाचा निर्णय घेण्यासाठी खालील मुद्दे समोर आले आहेत.

(*i*) उत्तरवादींनी फसवणुकीने नुकसान भरपाई मिळवण्यासाठी खोटे *का*गदोपत्री *पु*रावे तयार केले का?

(ii) विवादित *न्यायनिर्णय आणि अवॉर्ड बेकायदे*शीर*, चुकीचा आहे का आणि* त्यात *हस्तक्षेपाची गरज आहे का*?

12. शवविच्छेदन अहवाल निशाणी -३३ आणि मयताचा पंचनामा निशाणी -३२ मध्ये सलमान खान जहीर खान @जसवंत यादव ही दोन नावे स्पष्टपणे दिसत आहेत. प्रथम खबरी अहवाल निशाणी-३० मध्ये दोन नावे नमूद केलेली नाहीत. याचिकाकर्ते / दावेदार असे म्हणत नाहीत की मयत व्यक्ती सलमान खान याने धर्मांतर केले आहे त्यामुळे या दोन कागदपत्रांमध्ये दोन नावे दिसत आहेत. ही घटना १४/०८/२०२३ रोजी घडली असून त्याच दिवशी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. मयताचा पंचनामा दुसऱ्या दिवशी म्हणजे १५/०८/२०१३ रोजी करण्यात आला. शवविच्छेदन अहवालही

१५/०८/२०१३ रोजी तयार करण्यात आला होता. अहवाल दिनांक १४/०८/२०१३ रोजी दाखल आणि नोंद करण्यात आला असून त्यात जसवंत यादव यांचे नाव नाही.

13. उत्तरवादी क्रमांक १ खैरुन (पी.डब्ल्यू.1) ची उलटतपासणी जी निशाणी-२८ वर आहे त्यातील संबंधित भागावर चर्चा करणे योग्य ठरेल , ज्यात तिने उलटतपासणीदरम्यान तिचा कथित मुलगा सलमानशी असलेल्या संबंधांबद्दल उडवा उडवी ची उत्तरे दिली होती. तिने पुढे सांगितले की त्या अपघाताच्या वेळी सलमान चालवत असलेल्या मोटरसायकलचा मालक कोण होता हे माहीत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार, तिचा मुलगा ड्रायव्हर म्हणून काम करत होता आणि त्याच्याकडे चारचाकी वाहनाचे वैध ड्रायव्हिंग लायसन्स होते, परंतु ते कुठे हरवले आहे हे तिला माहित नाही. तिने पुढे सांगितले की, तिने ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत घेतली नाही किंवा त्या ड्रायव्हिंग लायसन्सच्या प्रकाराबद्दल कोणतीही चौकशी केली नाही. आपला मुलगा शाळेत गेला नाही आणि ज्या गावात त्याचा जन्म झाला त्या गावातून तिने त्याचा जन्म दाखला घेतला नाही, असेही तिने नमूद केले. सलमान खानचा जन्म गावात झाला हे निश्चित असेल तर त्याचा जन्मदाखला मिळायला हवा, पण तो पटलावर सादर करण्यात आला नाही. त्यामुळे सहज सादर करता आला असता असा पुरावा पटलावर सादर केला गेला नाही. दावेदार (पीडब्ल्यू-१) खैरुन यांनी यांच्या उलटतपासणीत दिलेली स्वीकृती आणि न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सलमान खानच्या संदर्भात दस्तऐवज सादर

करण्याबाबत ज्या प्रकारे तिने उलट तपासणीत उत्तरे दिली आहेत, यावरून असे कोणतेही दस्तऐवज अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट होते.

14. या न्यायालयाने दावेदारांना-उत्तरवादींना यापैकी कोणतेही दस्तऐवज सादर करण्यासाठी दोन संधी दिल्या होत्या. ही कागदपत्रे साहजिकच उत्तरवादींच्या ताब्यात असणे अपेक्षित आहे, परंतु ते सादर करण्यात अपयशी ठरले. एवढेच नव्हे तर दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश-११ च्या नियम-१६ नुसार कागदपत्रे सादर करण्याची नोटीस उत्तरवादी/दावेदारांना देण्यात आली. त्यावर दावेदारांनी म्हणणे दाखल केले आहे, परंतु अशी कोणतीही कागदपत्रे पटलावर दाखल करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे, भारतीय पुरावा कायदा १८७२ च्या कलम ११४ च्या स्पष्टीकरण (जी) नुसार उत्तरवादीं विरुद्ध प्रतिकूल निष्कर्ष काढता येतो की, संबंधित कागदपत्रे अस्तित्वात नाहीत आणि परिणामी त्यांनी ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत. उत्तरवादी यांनी सलमान सोबत त्यांचे असलेले नातेसंबंध शाबित केलेले नाहीत. त्यामुळे त्यांचा दावा नाकारला पाहिजे.

15. वर चर्चा केल्याप्रमाणे उत्तरवादींच्या वर्तनावरून हे स्पष्ट होते की, फसवणुकीने नुकसान भरपाईची रक्कम मिळवण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक खोटी कागदपत्रे तयार करून हा दावा दाखल केला आहे. त्या हेतूने, संबंधित वाहनाच्या चालकावरील गुन्ह्याचा

तपास करणाऱ्या तपास अधिकाऱ्याने त्या अपघातात मृत्यू पावलेली व्यक्ती कोण होती आणि त्याची दोन नावे का होती तसेच त्या मोटारसायकलचा मालक कोण होता, याची योग्य चौकशी करायला हवी होती. त्यामुळे, त्या अपघातात तथाकथित मृत्युमुखी पडलेल्या सलमानची ओळख पटलेली नाही. दावेदार हे त्यांचे नातेवाईक आणि अवलंबित नाहीत, जो या प्रकरणातील मुख्य मुद्दा आहे. त्यामुळे उत्तर वाली आणि दावेदार यांच्या विरुद्ध वाजवी शंका निर्माण होते की, त्यांनी तपास अधिकाऱ्याशी संगनमत करून खोटी कागदपत्रे तयार केली आहेत आणि नुकसान भरपाईसाठी खोटी याचिका दाखल केली आहे. विद्वान न्यायाधिकरणाने या सर्व बाबी योग्यरित्या विचारात घेतल्या नाहीत. त्यामुळे न्यायालयाचा असा दृष्टिकोन आहे की, न्यायाधिकरणाने दिलेली कारणे व निष्कर्ष हे कायदेशीर किंवा योग्य नाहीत, विशेषत: विवादित न्यायनिर्णयातील परिच्छेद ७ मध्ये दिलेले निष्कर्ष. सबब उत्तरवादींच्या अभ्यासू वकिलांचा युक्तिवाद या संदर्भात मान्य नाही.

16. उत्तरवादी / दावेदार यांच्या वकिलांनी न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला ज्यामध्ये ट्रकचालकाची निर्दोष मुक्तता करण्यात आली ज्यामध्ये साक्षीदार गौतम कवडूजी शंभरकर (पीडब्ल्यू-१) यांनी साक्ष दिली आहे की तो सलमान खानला ओळखतो. तपास अधिकारी निवृत्ती भीमराव घोरपडे यांनीही हेच तथ्य सांगितले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. परंतु फौजदारी न्यायालयाचा निर्णय दिवाणी न्यायालयाला बंधनकारक नाही.

त्यामुळे, वाहनचालकाची निर्दोष मुक्तता हे तथ्य दावेदारांना उपयोगी पडत नाही. त्यामुळे यासंदर्भात उत्तरवादींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरला जात नाही.

17. माननीय सर्वोच्च न्यायालयाने *तथाकथित* न्यायालयाचा *अवमान* करणाऱ्या पेरी कंसग्रा.. *या प्रकरणात जे प्रकाशित झाले*, 2022 *लाईव्ह लॉ* (*एससी*) 576 *मध्ये*, *यात* खालीलप्रमाणे निरीक्षण केले:

> "जी *व्यक्ती न्यायालयासमोर खोटे विधान* करते *आणि न्यायालयाला फसवण्याचा प्रयत्न* करते, ती न्याय प्रणाली मध्ये *हस्तक्षेप* करते *आणि न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी* दोषी असते. *न्यायालयाला केवळ अंगभूत अधिकारच* नाहीत *तर*, परंतु *जर न्यायालयाची प्रक्रिया* चुकीच्या *पद्धतीने वापरणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही केली नाही तर ते आपल्या कर्तव्याची पूर्तता करण्यात कमी* पडेल."

18. शेवटी माननीय सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे की, न्यायालयाला केवळ अंगभूत अधिकारच नाही तर, न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर केल्याबद्दल जर तथाकथित न्यायालयाच्या अवमान करत्या विरुद्ध अवमान याचिका दाखल केली नाही तर न्यायालयाच्या कर्तव्यात चूक होईल. त्यानंतर माननीय सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), नवी दिल्ली यांना त्यांच्या संचालकांमार्फत त्या

अवमानकर्त्याविरुद्ध फौजदारी कारवाई दाखल करून योग्य ती कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिले.

19. त्या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या तपास अधिकाऱ्याने त्या अपघातात मरण पावलेली व्यक्ती कोण आहे, याची ओळख पटवण्याबाबत कोणतेही प्रयत्न केले नाहीत. यामुळे त्याच्या निष्क्रियतेबद्दल वाजवी शंका निर्माण होते. जे कर्तव्यात कसूर करण्यासारखे आहे. दावेदार/याचिकाकर्ते, पोलीस व इतर व्यक्ती यांचे रॅकेट अस्तित्वात असण्याची शक्यता आहे व आर्थिक लाभ घेण्यासाठी ते खोटी कागदपत्रे तयार करण्याच्या अशा बेकायदेशीर कारवायांमध्येही सामील असावेत, हे श्रीमती खैरून (एडब्ल्यू-१) यांच्या उलटतपासणीतून व सर्व उत्तरवादी/दावेदारांच्या वर्तणुकीवरून सिद्ध होते. त्यामुळे, उत्तरवादी व तपास अधिकारी आदींनी गंभीर स्वरूपाची फौजदारी आगळीक केल्याबद्दल कडक कारवाई करणे योग्य ठरेल. त्यामुळे, अपीलकर्ता – विमा कंपनीला भादंवि च्या संबंधित तरतुदींनुसार दावेदार / उत्तरवादी क्रमांक १ ते ३ आणि इतर म्हणजेच निवृत्ती भीमराव घोरपडे व साक्षीदार गौतम कवडूजी शंभरकर व इतर अनोळखी व्यक्तींविरुद्ध फसवणूक, खोटी कागदपत्रे तयार करणे व विमा कंपनी व न्यायालयाविरुद्ध धोकाधडी केल्याबद्दल गुन्हा नोंद करण्यासाठी अहवाल दाखल करण्याचे निर्देश देणे गरजेचे आहे.

20. दावेदार/याचिकाकर्त्यां विरुद्ध या न्यायालयाचा फौजदारी अवमान केल्याप्रकरणी कारवाई करणेही योग्य ठरेल. त्यामुळे, उत्तरवादी / दावेदार यांच्याविरोधात न्यायालयाचा

अवमान केल्याप्रकरणी अर्ज दाखल करण्याचे निर्देश या न्यायालयाच्या रजिस्ट्रीला देणे गरजेचे आहे. वर चर्चा केलेल्या कारणांमुळे, उत्तरवादी-दावेदारांच्या विद्वान वकिलाचा युक्तिवाद की हे खोटे प्रकरण नाही, तो स्वीकारता येणार नाही.

21. हि केवळ फौजदारी आगळीक नाही तर दिवाणी आगळीक देखील आहे, त्यामुळे उत्तरवादी / दावेदारांवर रु.५०,०००/- इतका मोठा दंड ठोठावणे योग्य ठरेल. हा खर्च "अहसास" सिद्धार्थ सामाजिक विकास संस्थेच्या खाते क्रमांक १३०८२०११०००४९४, आयएफएससी कोड-बीकेआयडी०००१३०८, बँक ऑफ इंडिया, शाखा पोवई नाका, सातारा या मानसिक आजाराने ग्रस्त मुलांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थेकडे देण्यात यावा. म्हणून खालील प्रमाणे आदेश.

आदेश

ए) अपील मंजूर केले जाते आणि विवादित न्यायनिर्णय आणि अवॉर्ड रद्द केला जातो. दावा याचिका क्रमांक १२४७/२०१२ फेटाळली जाते.

बी) उत्तरवादींना एकत्रितपणे व स्वतंत्रपणे रु.५०,०००/- (पन्नास हजार रुपये मात्र) खर्च या न्यायालयात तीन महिन्यांच्या कालावधी च्या आत जमा करण्याचे निर्देश दिले जातात. जर ही रक्कम जमा केली नाही तर

उत्तरवादींना हा न्यायनिर्णय अपलोड केल्याच्या तारखेपासून तिचा पूर्ण भरणा होईपर्यंत त्यावर ९ टक्के व्याज द्यावे लागेल. खर्च जमा झाल्यानंतर तो "अहसस" सिद्धार्थ सामाजिक विकास संस्था खाते क्रमांक १३०८२०११०००००४९४, आयएफएससी कोड बीकेआयडी०००१३०८ बँक ऑफ इंडिया, पोवई नाका, सातारा, जी मानसिक आरोग्य समस्याग्रस्त व्यक्तींसाठी कार्यरत आहे त्यांच्या खात्यात हस्तांतरित केला जाईल.

सी) या न्यायालयाच्या रजिस्ट्रार (न्यायिक) यांना, उत्तरवादी आणि तपास अधिकारी इत्यादीं विरुद्ध अहवाल दाखल करण्यासाठी विद्यमान अपीलकर्त्यास - विमा कंपनीला सुचित करण्याचे निर्देश दिले जातात.

डी) या न्यायालयाच्या रजिस्ट्रार (न्यायिक) यांना निर्देश दिले जातात की उत्तरवादीं विरुद्ध आणि तपास अधिकाऱ्यांविरुद्ध या न्यायनिर्णयाच्या कारणे आणि निष्कर्षानुसार स्वत:हून फौजदारी अवमान याचिका दाखल करावी.

इ) अवॉर्डनुसार ठेव म्हणून जमा केलेली रक्कम काढण्यासाठी असलेला दिवाणी अर्ज क्रमांक १२७०/२०२२ हा फेटाळण्यात आला आहे. ती रक्कम व त्यावरील व्याज काढण्याचा अधिकार अपीलकर्त्याला आहे.

एफ) आर अँड पी परत पाठवण्यात यावे.

न्यायमूर्ती. संजय ए. देशमुख

-------------------------------

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x